आतील पानात

- यांच्यावर देशद्रोहाचा खटला दाखल करा !
- शासनकर्ती जमात : स्वाभिमानाचा प्रवास आणि संघर्षाचा संकल्प...
- तिसऱ्या युथ आशियाई क्रीडा स्पर्धेत भारताला सुवर्णपदक



दैनिक **अक्षराज**

अचूक वेध, अचूक बातमी

संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध

Email : newsaksharaj2021@gmail.com


**आजचा सुविचार**

माणसाला आपल्या दारिद्र्याची
लाज वाटता कामा नये...
लाज वाटायला पाहिजे
ती आपल्या दुर्गुणांची...

– डॉ.बाबासाहेब आंबेडकर


वर्ष : ०५ | अंक : ७३, पाने : ०४, किंमत : ०३ रुपये | बुलडाणा, सोमवार, दि.२७ ऑक्टोबर २०२५ | संपादक : विनोद कैलास गोरे | RNI NO. : MAHMAR/2022/82056


# ठाकरे बंधूंच्या युतीमुळे एकनाथ शिंदेंना फायदा ?



**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.२६, मुंबई :** मुंबई महापालिकेच्या निवडणुकीत राजकीय रंग भरण्यास सुरुवात झाली असून, राज ठाकरे यांची महाराष्ट्र नवनिर्माण सेना आता शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे या पक्षासोबत जाण्याचे जवळजवळ निश्चित झाले आहे. त्यामुळे भाजप आणि एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखालील शिवसेनेसोबत मनसे युती करणार या चर्चेला पूर्णविराम मिळाला आहे. मात्र याचा अप्रत्यक्ष फायदा शिंदे यांच्या सेनेला महायुतीमधील जागा वाढवून मिळण्यात होणार आहे. असं असलं तरी मुंबईत १५० जागा लढण्याचा निर्धार भाजपने केला आहे. दुसऱ्या बाजूला उद्धव ठाकरे व राज ठाकरे मुंबईत एकत्र आल्याने महाविकास आघाडीतील काँग्रेस व शरद पवार यांची राष्ट्रवादी काँग्रेस हे दोन्ही घटकपक्ष त्यांच्यासोबत राहतील की नाही, याबाबत अद्यापही संभ्रम कायम आहे.

लोकसभा आणि विधानसभा निवडणुकीत महायुतीसोबत राज ठाकरे यांची मनसे थेट सहभागी नसली, तरी पडद्याआडून महायुती व मनसे हे एकमेकांना मदत करत असल्याची चर्चा होती. त्यानंतर आता स्थानिक स्वराज्य संस्था, महापालिका निवडणुकीत मनसेची थेट भाजपशी नाही, तरी एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेसोबत युती होईल, असा अंदाज वर्तवला जात होता. परंतु, प्रत्यक्षात असं काहीही घडलेलं नाही. याउलट हिंदीसक्तीच्या मुद्यावरून प्रथमच एका व्यासपीठावर आलेल्या ठाकरे बंधूमधील राजकीय जवळीक वाढत गेली आहे. वारंवार स्वबळावर लढल्यानंतरही अपेक्षित यश मिळत नसल्यामुळे या वेळी युती वा आघाडी करायला हवी, असा मनसेच्या खालच्या फळीतील नेत्यांचा आग्रह होता.

एकनाथ शिंदेंच्या शिवसेनेत अनेक माजी नगरसेवकांनी प्रवेश केल्यामुळे त्यांच्याकडून जवळपास ७० ते ८० जागांवर दावा करण्यात आल्याचे समजते. साहजिकच त्यांना या जागा देऊन युतीमध्ये आणखी एका पक्षाला घेतलं तर भाजपच्या वाट्याला कमी जागा येणार होत्या. भाजपला जवळपास १५० जागा लढवायच्या असल्याने महायुतीत नव्या जोडीदाराला घेणे अवघड झाले आहे. त्यामुळे सर्व महापालिकांमध्ये महत्त्वाची मानली जाणारी मुंबई महानगरपालिका निवडणूक शिवसेना व भाजप अशा युतीनेच लढवण्यावर दिल्लीतील पक्षश्रेष्ठींचे एकमत झाल्याचे समजते. विशेष म्हणजे, महायुतीत नवा गडी येण्याचा मार्ग बंद झाल्याने शिंदे यांना ५ ते १० जागा वाढीव मिळणार असल्याचंही कळते.

**महाआघाडीत गुंता कायम !**

शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) व मनसे यांनी मुंबई महानगरपालिका निवडणूक एकत्रित येऊन लढवणार हे जवळपास निश्चित झाल्याचं समजतं. परंतु, उद्धव ठाकरे मविआचा एक भाग असल्यामुळे आघाडीतील घटक पक्ष असलेले काँग्रेस व राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्ष यांच्याबाबत नेमकी काय भूमिका घ्यायची याबाबत अद्याप गुंता कायम असल्याचं दिसत आहे. राज ठाकरेंना मुंबईत सोबत घेतलं तर त्यांना जागांमधला मोठा वाटा द्यावा लागेल. अशा स्थितीत शरद पवार; तसंच काँग्रेस यांनी जास्त जागा मागितल्या तर काय करायचे यावर 'उबाठा' पक्षात विचारविनिमय सुरू असल्याची माहिती आहे. बृहन्मुंबई, ठाणे, कल्याण-डोंबिवली, पुणे पिंपरी-चिंचवड, नाशिक या महानगरपालिकांमध्ये मनसेला अधिक जागा द्यायच्या व उर्वरित महाराष्ट्रात काँग्रेस; तसेच राष्ट्रवादी काँग्रेस (शप) पक्षासोबत जुळवून घ्यायचे यावर 'उबाठा'चे नेतृत्व गंभीर्याने विचार करत असल्याचे समजते. अशा सर्व परिस्थितीत इतर स्थानिक स्वराज्य संस्थांतील लढाईचे चित्र अस्पष्ट असताना मुंबईत मात्र फडणवीस व शिंदे यांच्या महायुतीविरोधात ठाकरे बंधू असा मुकाबला रंगणार असल्याचं निश्चित झाल्याची माहिती आहे.

---

## जिल्हा परिषद, पंचायत समितीत 'बायको माझी लाडकी' चा प्रयोग

### आरक्षणाने दांडी उडालेल्या इच्छुकांनी शोधला पर्याय; अर्ध्याहून अधिक जागांवर महिला आरक्षण



**अक्षराज : शिवराज मुगळे**

**दि.२६, सोलापूर :** सोलापूर तालुक्यातील जिल्हा परिषद, पंचायत समिती निवडणुकीसाठीच्या आरक्षण सोडतीत अनेक इच्छुकांच्या दांड्या उडाल्या आहेत. निवडणूक लढविण्याच्या त्यांच्या महत्त्वाकांक्षेला आरक्षणाचा खोडा आडवा येऊ शकलेला नाही. 'मला नाही तर माझ्या बायकोला' म्हणत इच्छुकांनी निवडणूक रिंगणात उतरण्याची तयारी सुरु केली आहे. त्यामुळे इच्छुक यंदाच्या निवडणुकीत अनेक मतदारसंघांत कोठे पत्नी, कोठे मुलगी, कोठे आई, तर कोठे बहिणीला मैदानात उतरविण्याची चर्चा आहे. पण गेले वर्षभर इच्छुक कार्यकर्त्यांनी आपापल्या मतदारसंघात जोरदार बॅनरबाजी सुरु केली होती. विविध स्पर्धा, शर्यती, खेळ पैठणीचा, गणेशोत्सव, नवरात्रउत्सव मध्ये अशा कार्यक्रमांमधून थेट जनतेत आपली उमेदवारी जाहीर केली होती. प्रश्न फक्त आरक्षणाचा होता. त्यामुळेच आरक्षण प्रक्रियेकडे त्यांच्या नजरा लागल्या होत्या. पण अनेक ठिकाणी अनपेक्षितपणे महिला पडले आणि आरक्षण इच्छुकांच्या दांड्या उडाल्या. परंतु 'मैदानातून माघार नाही' या निश्चयी भूमिकेसह त्यांनी निवडणुकीसाठी नव्याने मशागत सुरु केली आहे. मला निवडणूक लढवता येत नसली तरी माझ्या सौभाग्यवतीला जनतेचा भक्कम पाठिंबा आहे, अशा भूमिकेसह ते मैदानात उतरण्याची तयारी करीत आहेत. गेले वर्षभर स्वतःला बॅनरवर झळकणारे कार्यकर्ते आता आरक्षण सोडत झाल्यापासून आपल्या सौभाग्यवतींना बॅनरवर झळकावणारा दिसू लागले आहेत. त्यामुळे या निवडणुकीत 'बायको माझी लाडकी' प्रयोग रंगण्याची चिन्हे आहेत.

**● इच्छुकांच्या आकांक्षांना फुटले धुमारे...**

जिल्हा परिषदेचे अध्यक्षपद ओबीसी असले तरी निकालानंतर अध्यक्ष पदासह विविध समित्यांच्या सभापतीपदी आपल्या घरातील महिलेला संधी मिळू शकते. या आशेने इच्छुकांच्या आकांक्षांना चांगलेच धुमारे फुटले आहेत. मतदारसंघात महिला आरक्षणामुळे स्वतःला निवडणूक लढवता येत नसली, तरी आपल्या पत्नीला निवडणुकीच्या रिंगणात उतरवून निवडून आणायचे. यासाठी जोरदार फिल्डिंग लावण्याचे प्रयत्न सुरु आहेत.

**● महिलांना ५० टक्के आरक्षण...**

**१)** कार्यकर्त्यांच्या कुटुंबातील महिलांना संधीजिल्हा परिषद, पंचायत समितीच्या निवडणुकीत यंदा विशेष म्हणजे सर्वच पक्षांत ही घराणेशाही दिसणार आहे. पंचायत समिती, जिल्हा परिषदेच्या निवडणुकांत पॅनल किंवा पक्षांचे अस्तित्व ठळक नसते, पण यंदाच्या निवडणुकीत थेट पक्षीय लढत होण्याची चिन्हे आहेत.

**२)** प्रमुख पक्षांकडून उमेदवार पुरस्कृत केले जाऊ शकतात. सर्वच प्रमुख पक्षांमध्ये कार्यकर्त्यांच्या घरातील महिलांना संधी दिली जाऊ शकते. मोठ्या प्रमाणात महिला आरक्षणामुळे अन्य पर्यायही नसेल. काही ठिकाणी मातोश्रीला, तर काही ठिकाणी बहिणीला निवडणुकीच्या मैदानात उतरवण्याची तयारी सुरु आहे. त्यासाठी आत्तापासूनच मोर्चेबांधणीस सुरुवात करण्यात आलेली आहे.

---

## गोंडपिपरीत वाघाचे थैमान ! ८ दिवसात दुसरा बळी



**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.२६, गोंडपिपरी (चंद्रपूर) :** गोंडपिपरी तालुक्यात वन्यजीव हल्ल्याची मालिका सुरुच असून, येथील गणेशपिपरी गावात वाघाने पुन्हा एकदा धुमाकूळ घालत एका महिलेचा बळी घेतला आहे. आज रविवार दि.२६ ऑक्टोबर ला सायंकाळच्या सुमारास ही ह्दयकारक घटना घडली. यामुळे तालुक्यात प्रचंड दहशत आणि संतापाचे वातावरण पसरले आहे.

अल्का महादेव पेंदोर (वय ४५) असे मृत महिलेचे नाव आहे. मजूर मिळत नसल्याने त्या एकट्याच आपल्या शेतात कापूस वेचणीसाठी गेल्या होत्या. त्यांचे पती बैल घेऊन घरी परतले, मात्र उशिरापर्यंत अल्का घरी न परतल्याने कुटुंबियांना भीती वाटली. गावकऱ्यांनी शोध घेतला असता, शेतशिवारात अल्का यांचा मृतदेह अतिशय छिन्नविछिन्न अवस्थेत आढळून आला.

**● वनविभागाच्या उपाययोजनांना अपयश**

गेल्या काही दिवसांपासून गोंडपिपरी तालुक्यातील विहीरगाव, वटराणा, गणेशपिपरी आणि चेकपिपरी या भागात वाघाची दहशत वाढली होती. या वाघाने अनेक पाळीव जनावरांची शिकार केली होती.

**दुसरा बळी :** आठ दिवसापूर्वी याच वाघाने चेकपिपरी येथील ७० वर्षीय शेतकरी भाऊजी पाल यांचा बळी घेतला होता. या घटनेनंतर आ. देवराव भोंगळे यांनी वनमंत्री गणेश नाईक यांच्याकडून वाघाला जेरबंद करण्याचे आदेश मिळविले होते. मात्र वनविभागाला या आदेशाचे पालन करण्यात अपयश आले.

८ दिवसात दोन शेतकऱ्यांचे बळी गेल्यामुळे नागरिकांमध्ये तीव्र संतापाची लाट पसरली आहे. घटनेची माहिती मिळताच वमविभागाची चमू तात्काळ गणेशपिपरी येथे दाखल झाली. मात्र, संतापलेल्या ग्रामस्थांनी मृतदेह उचलण्यास स्पष्ट नकार दिला. जोपर्यंत या नरभक्षक वाघाला जेरबंद केले जात नाही आणि मृत कुटुंबाला सन्मानजनक आर्थिक मदत दिली जात नाही, तोपर्यंत मृतदेह हलवणार नाही, अशी भूमिका गावकऱ्यांनी घेतली आहे. उशिरापर्यंत गावकऱ्यांचा हा विरोध सुरु होता.

सध्या कापूस वेचणीचा महत्वाचा हंगाम सुरु असताना, वाघाच्या भीतीमुळे शेतीत काम करणे शेतकऱ्यांसाठी जीवघेणे ठरले आहे. या वाघाचा तातडीने बंदोबस्त करण्याची मागणी आता जोर धरु लागली आहे.

**● आत्तापर्यंत ३६ बळी!**

चंद्रपूर जिल्ह्यात वन्यप्राण्यांच्या हल्ल्याची मालिका सुकु झाली आहे. यावर्षी ३६ नागरिकांनी वन्यप्राण्यांच्या हल्ल्यात आपला जीव गमावसा असून यामध्ये ३२ वाघाच्या हल्ल्यात, २ बिबट, एक हत्ती व एकाचा अस्वलीच्या हल्ल्यात मृत्यू झाला आहे.

---

## पारनेरमध्ये राजकीय भूकंप! सुजित झावरे पाटील सोडणार राष्ट्रवादी, हाती घेणार धनुष्यबाण

### सुजित झावरे पाटील ६ नोव्हेंबर रोजी शिंदेसेनेत प्रवेश करणार




**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.२६, पारनेर (अहिल्यानगर) :** आगामी स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर पारनेर तालुक्यातील राजकीय वातावरण ढवळून निघाले आहे. जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष सुजित झावरे पाटील हे राष्ट्रवादीला रामराम करत शिवसेना (एकनाथ शिंदे गट) मध्ये प्रवेश करण्याचा निर्णय घेतला असून, हा भव्य सोहळा ६ नोव्हेंबर रोजी पारनेर येथे आयोजित करण्यात आला आहे. या कार्यक्रमाला स्वतः उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे उपस्थित राहणार असून, त्यांच्या उपस्थितीत झावरे पाटील यांचा पक्षप्रवेश होणार आहे. या घटनेमुळे तालुक्यातील राजकीय समीकरणे बदलण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

सुजित झावरे पाटील यांचा पारनेर सह अहिल्यानगर जिल्ह्यामध्ये मतदारसंघात फार मोठा दांडगा जनसंपर्क आहे. झावरे यांचा पारनेर तालुक्यातील तळागाळातील जनतेमध्ये संपर्क असून येणाऱ्या जिल्हा परिषद पंचायत समिती निवडणुकीच्या वेळी राष्ट्रवादीला खुप मोठी त्यांची उणीव भासणार हे मात्र नक्कीच, पक्षाच्या वाढीसाठी प्रमाणिक काम केले. यामुळे त्यांच्याप्रती अहमदनगर जिल्ह्यामध्ये खुप मोठा आदर आहे. मात्र पक्षासाठी एवढे प्रमाणिक काम करूनही त्यांच्यावर सतत अन्याय होत असल्याचे बोलले जात आहे. त्यांच्या कार्यकर्त्यांमध्ये अस्ताव्यस्ता निर्माण झाली होती. त्यातच आमदार काशिनाथ दाते ही त्यांना दुय्यम वागणूक देत असल्याचे सुजित झावरे पाटील यांनी जाहीरपणे सांगितले आहे. जरी त्यांच्या जाण्याने फरक पडणार नाही असे म्हणले जात असले तरी मात्र पक्ष संघटनेवर याचा खूप मोठा परिणाम होईल हे सर्वसामान्य जनतेकडून बोलले जात आहे.

सुजित झावरे पाटील हे पारनेर तालुक्यातील एक प्रभावी मात्तबर नेते आहेत. त्यांचा तरुणांमधील जनसंपर्क आणि सामाजिक कार्यामुळे त्यांना मोठा पाठिंबा आहे. त्यांच्या पक्षप्रवेशामुळे शिवसेना (शिंदे गट) ला तालुक्यात बळ मिळण्याची अपेक्षा आहे. हा प्रवेश स्थानिक पातळीवरील राजकीय गणिते बदलण्यास कारणीभूत ठरू शकतो, असे राजकीय विश्लेषकांचे मत आहे. विशेषतः आगामी निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर हा निर्णय महत्त्वाचा मानला जात आहे.

या सोहळ्याच्या तयारीसाठी शिवसेना (शिंदे गट) ने जोरदार तयारी सुरू केली आहे. पारनेर येथील कार्यक्रमस्थळी मोठ्या संख्येने कार्यकर्ते आणि समर्थक उपस्थित राहण्याची शक्यता आहे. उपमुख्यमंत्री शिंदे यांच्या उपस्थितीमुळे या कार्यक्रमाला विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे. यावेळी झावरे पाटील यांच्यासोबत त्यांचे अनेक समर्थकही पक्षात प्रवेश करतील, अशी माहिती सूत्रांनी दिली आहे.

या प्रवेशामुळे पारनेर तालुक्यातील राजकीय शक्तीप्रदर्शनाला नवी दिशा मिळण्याची शक्यता आहे. येत्या काही दिवसांत येथील राजकीय घडामोडींवर सर्वांचे लक्ष केंद्रित असेल. सुजित झावरे पाटील यांच्या या निर्णयामुळे शिवसेना शिंदे गटाला तालुक्यात नवी ताकद मिळेल,असा विश्वास पक्षाच्या स्थानिक नेत्यांनी व्यक्त केला आहे.

---

## पडक्या घराजवळून जाताना अनर्थ, ८ वर्षीय चिमुकल्यावर भिंत कोसळली



**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.२६, अकोला :** हवामान खात्याच्या अंदाजानुसार गेल्या दोन दिवसांपासून राज्यातील काही जिल्ह्यात पावसाचा जोर वाढला आहे. पावसामुळे शेती पिकाचे नुकसान होतच आहे, मात्र घरांचेही नुकसान होत आहे. याचदरम्यान, एक दुर्दैवी घटना अकोला जिल्ह्याच्या बाळापूर तालुक्यातील हातरुण गावात घडली आहे. पावसामुळे घराची भिंत कोसळून एका आठ वर्षीय चिमुकल्याचा करून अंत झाला आहे. शेख हसनैन शेख बिस्मिल्लाह कुरेशी असं मृत झालेल्या चिमुकल्याचं नाव आहे. आपल्या ग्रामीण भागात आजही अनेक परिवारांची हलाखीची परिस्तिथी आहे. असा एक परिवार अकोल्याच्या बाळापूर तालुक्यातील हातरुण या गावात राहतो. या परिवारावर आज शोककळा पसरली आहे. कारण या परिवारातील आठ वर्षाचा चिमुकला अंगावर भिंत कोसळल्याने दगावला आहे. शेख हसनैन शेख बिस्मिल्लाह कुरेशी असं मृत मुलाचं नाव आहे. शेख हसनैन शेख बिस्मिल्लाह कुरेशी हा त्याच्या परिवारातील एक मोठा भाऊ आणि मोठ्या बहिणीनंतर सर्वात लहान मुलगा होता. आई-वडील हातमजुरीवर आपल्या संसाराचा गाडा हाकतात. मात्र, आज या गरीब परिवारावर आठ वर्षाचा चिमुकला दगवल्याने शोककळा पसरली आहे.

**कशी घडली घटना?**

अकोल्याच्या बाळापूर तालुक्यातील हातरूण गावात आज रविवारी रोजी दुपारी १२:३० ते १.०० वाजेच्या सुमारास एक हृदयद्रावक घटना घडली. ती म्हणजे घराची भिंत कोसळून एका निष्पाप आठ वर्षीय मुलाचा मृत्यू झालाय. शेख हसनैन शेख बिस्मिल्लाह कुरेशी असं या मुलाचं नाव असून, हा चिमुकला मधुकर नारायण गावंडे यांच्या पडक्या घराजवळून जात असतांना गावंडे यांच्या घराची भिंत अचानक कोसळली. शेख हसनैन शेख बिस्मिल्लाह कुरेशी हा तेथूनच जात असल्यानं तो भिंतीच्या मलब्याखाली दबला गेला. गावातील नागरिकांनी त्याला तात्काळ जवळच्या रुग्णालयात हलवले, मात्र पूर्ण उपचार मिळत नसल्यानं अकोल्यातील शासकीय रुग्णालयात उपचारासाठी आणण्यात आल. मात्र, तोपर्यंत नियतीने आपला डाव साधला होता. डॉक्टरांनी त्याला मृत घोषित करताच गावात शोककळा पसरली. या घटनेमुळे हातरुण गावात सर्वत्र शोककळा पसरली आहे.




## संत शिरोमणी

संत शिरोमणी नामदेव महाराज यांची काल २६ ऑक्टोबर रोजी जयंती होती. संत शिरोमणी नामदेव महाराज यांचा जन्म २६ ऑक्टोबर १२७० रोजी हिंगोली जिल्ह्यातील नरसी गावात एका गरीब शिंपी कुटुंबात झाला. त्यांच्या वडिलांचे नाम दामाशेठी तर आईचे नाव गोनाई असे होते. त्यांना एक बहिणही होती तिचे नाव आऊबाई असे होते. वयाच्या ११ व्या वर्षी त्यांचा विवाह राजाबाईशी झाला. त्यांना चार मुले व एक मुलगी होती. मुले, मुली, सुना, नातवंडे असा मोठा परिवार असणारे नामदेव महाराज मात्र विठ्ठल भक्तीत लिन असायचे. लहानपणापासूनच नामदेव विठ्ठलमय झाले होते. विठ्ठल हेच त्यांच्यासाठी सर्वकाही होते. देव, आईबाप, गुरू, सखासोयरा, स्वामी तोच होता. विठ्ठल भक्तीत ते इतके लिन असायचे की साक्षात विठ्ठल त्यांना भेटायला यायचे असे म्हटले जाई. त्यांच्या हट्टापायी विठ्ठलाने त्यांच्या घरी येऊन दुधाच्या नैवेद्याचे सेवन केले होते अशी आख्यायिका प्रसिद्ध आहे. एकदा एका कुत्र्याने त्यांच्या घरी येऊन रिकामी वाटी पळवली तेंव्हा तेंव्हा कुत्र्याला भूक लागली असून वाटीत तर काहीच नाही म्हणून ते कुत्र्याच्या मागे सुकी भाकर आणि तुपाची वाटी घेऊन त्याला देण्यासाठी त्याच्या मागे धावत होते. लहानवयातच सर्वांभूती परमेश्वर ही भावना त्यांच्यात दिसून आली. लहानपणापासूनच विठ्ठलाचे भक्त असलेल्या नामदेवांनी सत्य समजून घेण्यासाठी वेदज्ञ ब्राह्मणांकडे हेलपाटे मारले पण नामदेव हे शूद्र जातीचे असल्याने त्यांना ब्रह्म जाणून घेण्याचा अधिकार नाही असे सांगून त्यांना ज्ञान घेण्यापासून रोखण्यात आले. तेंव्हा त्यांनी भक्तीतून थेट परमेश्वरलाच आधार मानून स्वतःच बुद्धीचा कस लावत विश्वाचे सत्य समजून घेण्याचा प्रयत्न केला. त्याचाच एक भाग म्हणून ते लंगोटी नेसून चंद्रभागेच्या वाळवंटात कीर्तन करत सदविचारांचा प्रसार करू लागले. ही वाट त्यांना स्वतःच शोधायची होती. त्यातून साधनेची नवीनवी साधनं निर्माण होऊ लागली. श्रोत्यांनाही समजून घेणारी वारकरी सामूहिक कीर्तनाची मुहूर्तमेढ त्यांनीच रोवली. त्यासाठी त्यांनी अभंग या छंदाची निर्मिती केली. नामदेवांनीच वारकऱ्यांच्या लाडक्या काल्याच्या कीर्तनाची सुरुवात केली. नामदेव महाराजांना अभंग लेखनाचा इतका छंद जडला की त्यांनी जवळपास १ कोटी अभंग लिहिले. याचाच अर्थ त्यांनी विपुल साहित्य लेखन केले. त्यांच्या साहित्याची भाषा खूप सोपी होती. ज्ञानेश्वर, मुक्ताबाई, चांगदेव या त्यांच्या समकालीन संतांच्या तुलनेत आज आपल्याला त्यांची भाषा लगेच कळते. त्यांनी कायम सर्वसामान्यांसाठी लिहिले. त्यात संवाद आहे. नाट्य आहे. लोककलांचे विविध प्रकार आहे. ज्ञानेश्वरांच्या समाधी नंतरही नामदेवांनी तीर्थयात्रा करून रामेश्वरापासून मुलतान पर्यंतचा भारत पालथा घातला. जे जिथे गेले तिथले बनले. त्यांनी तिथल्या स्थानिक भाषेत लोककाव्य लिहिले. त्यांनी हिंदी साहित्याला नवा आयाम दिला. त्यांच्या कामातूनच पुढे रामानंद, कबीर, नानक, दादू दयाळ, मीरा, नरसी मेहता अशी संताची मांदियाळी देशभर उभी राहिली. पंजाबात तर ते दोन दशकांहून अधिक काळ राहिले. शीख धर्माच्या गुरु ग्रंथासाहेब या पवित्र ग्रंथात त्यांची ६१ पदे समाविष्ट आहेत. पंजाबात आजही त्यांच्या अभंगाचे नियमित वाचन केले जाते. पंजाबातच नाही तर संपूर्ण देशात त्यांना मानणारा मोठा वर्ग आहे. महाराष्ट्र आणि पंजाब बरोबरच राजस्थान, गुजरात, मध्यप्रदेश, उत्तरप्रदेश, हरियाणा, उत्तराखंड, उत्तरांचल, हिमाचल प्रदेश या राज्यात त्यांची मंदिरे आहेत. तामिळनाडू पासून काश्मीरपर्यंत लाखो लोक त्यांचे नाव किंवा आडनाव किंवा जातीची ओळख अभिमानाने मिरवतात. संपूर्ण देशात प्रभाव असणारे नामदेव हे एकमेव संत आहेत म्हणूनच त्यांना संत शिरोमणी असे म्हणतात. ३ जुलै १३५० रोजी वयाच्या ८० व्या वर्षी अत्यंत समाधानाने आपला देह ठेवला. त्यांची एक समाधी पंढरपुरात विठ्ठलाच्या पायरीशी आहे तर दुसरी पंजाबमधील घुमान येथे आहे. या समाधीचे दर्शन घेण्यासाठी दररोज हजारो भाविक मोठ्या भक्तिभावाने या ठिकाणी येतात आणि नतमस्तक होतात.

# दिवाळी सण आनंदाचा कि प्रदूषणाचा ?



दिवाळी आनंदाचा सण असला, तरी या दिवसांत केल्या जाणाऱ्या फटाक्यांच्या आतषबाजीमुळे अनेकांना आयुष्यभराचा त्रास सहन करावा लागतो. प्रदूषणाच्या बाबतीत दिल्लीशी स्पर्धा करत असताना यंदा दिवाळीच्या पहिल्या दोन दिवसांत मुंबईतील हवेची गुणवत्ता कमालीची घटली. प्रदूषणाचा स्तर झपाट्याने वाढला. लक्ष्मीपूजनाच्या रात्री मुंबईतील नागरिकांनी प्रचंड प्रमाणात फटाके फोडले, ज्याचा थेट परिणाम शहराच्या हवेच्या निर्देशांकावर **(AQI)** झाला. मंगळवारी सकाळी मुंबईचा हवा निर्देशांक २११ इतका नोंदवला गेला, जो 'खराब' या श्रेणीत मोडतो. फटाक्यांमुळे हवेमध्ये सूक्ष्म धूलिकणांचे प्रमाण वाढले. ज्यामुळे अनेकांना शिंका येऊन सर्दी पडशाचा त्रास सुरु झाला. श्वसन विकार असलेल्यांना तर डॉक्टरांनी घराबाहेर न पडण्याचा आणि दिवसभर मास्क लावण्याचा सल्ला दिला. दिवाळीत फोडल्या जाणाऱ्या फटाक्यांमुळे प्रदूषणात प्रचंड वाढ होणार हे लक्षात घेऊन न्यायालयाने जनतेला केवळ हरित फटाके फोडण्याचे आवाहन केले होते. फटाके फोडण्यावर वेळेचेही बंधन लावण्यात आले होते. लक्ष्मीपूजनाचा दिवस वगळता अन्य दिवशी रात्री १० वाजेपर्यंतच फटाके फोडण्यास अनुमती देण्यात आली होती; मात्र तरीही शहरात मध्यरात्री १ ते २ वाजेपर्यंतही कुठेनाकुठे फटाक्यांचे आवाज ऐकू येत होते. लक्ष्मीपूजनाच्या दिवशी प्रदूषणाने सर्वत्र कमाल मर्यादा गाठली. या सर्वांचा लोकांच्या आरोग्यावर विपरीत परिणाम होऊन खासगी तसेच सरकारी दवाखान्यांसमोर रुग्णांच्या रांगा दिसून आल्या. प्रदूषणामुळे शिंका येणे, घसा खवखवणे, खोकला, सर्दी, श्वास घेण्यास त्रास होणे, ताप, डोळे जळजळणे यांसारख्या आजारांनी नागरिक त्रस्त होऊ लागले. यामध्ये लहान मुलांची संख्या अधिक होती.

दरवर्षी फटाक्यांमुळे अनेक ठिकाणी आग लागण्याच्या घटना घडतात ज्यामध्ये वित्त हानी तर होतेच शिवाय काहीवेळा आकस्मिक आग लागल्याने जीवित हानीही होते, अपंगत्व, अंधत्व आणि बहिरेपणाही येतो. यंदा नवी मुंबईत दिवाळीतील फटाक्यांमुळे एकाच दिवशी आगीच्या तीन मोठ्या दुर्घटना घडल्या. फटाक्यांमुळे ;लागलेल्या आगीमुळे शिर्डीत चार दुकाने जळून भस्मसात झाली. लक्ष्मीपूजनाच्या दिवशी नागपुरात सात ठिकाणी फटाक्यांमुळे आग लागण्याच्या घटना घडल्या ज्यामध्ये लक्ष्मीनगरमधील रिलायन्स मॉल आगीच्या भक्ष्यस्थानी पडून कोट्यवधी रुपयांचे नुकसान झाले. दिवाळीच्या चार दिवसांत पिंपरी परिसरात फटाक्यांमुळे १७ ठिकाणी आग लागल्याच्या घटनांची नोंद करण्यात आली ज्यामध्ये मोठ्या प्रमाणात वित्तहानी झाली. ठाण्यात दिवाळीच्या पहिल्याच दिवशी सहा ठिकाणी आग लागण्याच्या घटना घडल्या ज्यामध्ये फटाके आगी लागण्याचे प्रमुख कारण होते. लक्ष्मीपूजनाच्या एका रात्री पुण्यात ३० ठिकाणी आग लागण्याच्या घटना घडल्या त्यातील बहुतांश आगी फटाक्यांमुळे लागल्या होत्या. राजस्थानमधील जैसमलेर येथील एका बसला आग लागून सुमारे २६ प्रवाशांचा दुर्दैवी मृत्यू झाला. बसमध्ये असलेल्या फटाक्यांमुळे ही दुर्घटना घडली आणि क्षणार्धात तिने उग्र स्वरूप धारण करून २६ जणांचे प्राण घेतले. फटाक्यांमुळे नाशिकात ६ ठिकाणी आग लागण्याचा घटना घडल्या. मुंबईतील धोबीघाट परिसरात फटाक्यांमुळे लागलेली आग लोकांच्या सतर्कतेमुळे वेळीच आटोक्यात आणता आली. गाझियाबादमध्ये जळका फटाका इन्व्हर्टवर पडला आणि संपूर्ण इमारत जळून खाक झाली. याशिवाय अनेक ठिकाणी लागलेल्या लहानमोठ्या आगी स्थानिक नागरिकांच्या सतर्कतेमुळे वेळीच रोखण्यात आल्या. डोळ्याजवळ फटाका फुटल्याने डोळ्यांना दुखापत होणे, हात पाय भाजणे, बुबुळांना इजा होणे, चेहेरा भाजणे, कानाचा पडदा फाटणे, ऐकू यायचे बंद होणे, डोळे जळजळणे, डोळ्यांतून पाणी येणे, फटाक्यांच्या अति आवाजामुळे चक्कर येणे, डोके दुखणे यांसारख्या आजारांनी त्रस्त झालेले अनेक रुग्ण दिवाळीच्या काळात वाढल्याची नोंद ठिकठिकाणी रुग्णालयांतून करण्यात आली.

दिवाळी खरेतर नातेवाईकांसोबत एकत्र साजरा करण्याचा सण; मात्र फटाक्यांचा जीवघेणा धूर आणि आवाज नको म्हणून शहरातील श्वसनविकार, हृदय विकार असणारे अनेक जण दिवाळीच्या आधीच गावी किंवा शहराबाहेर मित्रमंडळींकडे, अन्य नातेवाईकांकडे काही दिवसांसाठी राहायला जातात. जे इथे आपल्या नातेवाईकांसोबत दिवाळी साजरी करण्यासाठी थांबतात त्यांना फटाक्यांच्या प्रदूषणामुळे जीव नकोसा होऊन जातो. गर्भवती स्त्रिया, मनोरुग्ण यांनाही फटाक्यांच्या आवाजाचा आणि विषारी वायूचा प्रचंड त्रास सहन करावा लागतो. कुत्रे, मांजरी यांसारखे पाळीव प्राणी, पक्षी यांच्या आरोग्यावरही फटाक्यांचा विपरीत परिणाम होतो, फटाक्यांमुळे ते भयभीत होऊन सैरावैरा धावू लागतात. भीतीमुळे अनेकदा हे प्राणी आणि पक्षी जीवसुद्धा गमावतात. वास्तविकत: दिवाळी हा दिव्यांचा सण. तिमिराकडून तेजाकडे जाण्याची शिकवण देणारा सण; मात्र दिवाळीतील जीवघेण्या फटाक्यांमुळे आपला प्रवास तेजाकडून तिमिराकडे चालला आहे कि काय असे वाटू लागते. दिवाळी आणि फटाक्यांचा काडीचा संबंध नाही. फटाक्यांची निर्मिती केवळ आतषबाजीसाठी करण्यासाठी करण्यात आली आहे. दिवाळीच्या काळात आतषबाजी करावी असा उल्लेख कोणत्याही प्राचीन ग्रंथांत अथवा धर्मशास्त्रात नाही, मग दिवाळीसारख्या पवित्र सणात ही प्रदूषणाची खैरात कशासाठी ? फटाक्यांमुळे क्षणिक सुख मिळते मात्र त्यापासून होणारे नुकसान कैकपटीने अधिक असते. यंदा केवळ दिवाळीच्या काळात सात हजार कोटी रुपयांचे फटाके उडवण्यात आले. आजमितीला देशाचा काही भाग दारिद्र्य रेषेखाली जीवन कंठत आहे, ज्यांना दिवसातून २ वेळा अन्न मिळणेही दुरापास्त आहे,अशा देशात फटाके फोडण्यात आणि त्यापासून होणारे नुकसान निस्तरण्यात अब्जोवधी रुपये खर्च होत असतील तर ते देशाला नक्कीच परवडणारे नाही. ज्या गोष्टी धर्मशास्त्रात नाहीत आणि जर त्यामुळे सामाजिक स्वास्थ बिघडणार असेल तर अशा बाबींवर बंदी आणणेच योग्य आहे. दरवर्षी दिवाळीच्या दरम्यान फटाक्यांमुळे होणारी वित्त आणि जीवित हानी, फटाक्यांच्या बाबतीत न्यायालयाला करावा लागणार हस्तक्षेप, या दिवसांत प्रशासनावर पडणारा अधिक भार या सर्व बाबी लक्षात घेऊन दिवाळीच्या काळात फटाके फोडण्यावर केंद्र सरकारने देश पातळीवर बंदी आणायला हवी !

**जगन घाणेकर, घाटकोपर, मुंबई**
**संपर्क : ९६६४५५९७८०**

# शासनकर्ती जमात : स्वाभिमानाचा प्रवास आणि संघर्षाचा संकल्प




भारतात आज प्रत्येक घटक सत्तेच्या केंद्रात पोहोचण्याची आकांक्षा बाळगतो. पण शासनकर्ती जमात बनणे म्हणजे केवळ निवडणुकीत जिंकणे नाही, तर विचाराने, संघटनाने आणि आत्मभानाने समाजाला दिशा देणे होय. केवळ संख्या नाही, तर सामर्थ्य, एकजूट आणि जागृती हाच खरा सत्तेचा पाया आहे. कारण संख्येने मोठे असणे पुरेसे नाही, विचाराने, संघटनेने आणि कृतीने सक्षम बनल्याशिवाय सत्ता हातात येत नाही. अंतर्गत मतभेद आणि उपगटवाद जे थांबवतात प्रवास. आपला समाज उपजतच विभागला गेला आहे. जात, पंथ, संस्था आणि अहंकार यांच्या भिंतींनी. आपण सारे एक ही भावना अजूनही कृतीत उतरलेली नाही.

नेतृत्वाचा अभाव आणि सत्तालालसामुळे खरे लोकनेते मागे पडतात, संधीसाधू पुढे येतात. नेतृत्व ही जबाबदारी नव्हे तर प्रतिष्ठेची जागा बनली आहे. जनतेचा विश्वास या स्वार्थी खेळांमुळे हरवत चालला आहे. शिक्षण आणि अर्थव्यवस्थेतील कमजोरीमुळे शासन हे ज्ञानावर आणि संपन्नतेवर उभे असते. शिक्षणाचा प्रकाश आणि आर्थिक स्वावलंबन हेच सत्तेचे खरे शस्त्र आहेत. जे आजही अनेकांना न मिळाल्याने समाज निर्णयक्षम होत नाही. धर्म, भाषा, प्रांत आणि जातीच्या नावाखाली समाजात फूट पाडली जाते. एकजूट मोडली की सत्ता हातातून निसटते. आपण सत्तेसाठी जन्मलो नाही ही मानसिक गुलामी अजूनही टिकून आहे. स्वतःच्या सामर्थ्यावर विश्वास ठेवला नाही तर इतर आपल्या भविष्यावर नियंत्रण ठेवतील.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या त्रिसूत्रीची आज सर्वाधिक गरज आहे. शिका, संघटित व्हा, संघर्ष करा. विचारशक्ती आणि विवेक विकसित केला तर कोणताही समाज झुकत नाही. सत्ता टिकवायची असेल तर आर्थिक स्वातंत्र्य अनिवार्य आहे. उद्यमशीलता, तंत्रज्ञान आणि व्यवसाय यात सहभाग वाढवावे लागेल. वैयक्तिक महत्वाकांक्षा बाजूला ठेवा. सामूहिक विचार, सामूहिक निर्णय आणि सामूहिक नेतृत्व यांवर भर द्यावे लागेल. प्रत्येक गल्लीत, प्रत्येक गावात संघटनाचे बी पेरा. वाचनसंस्कृती, संवाद आणि बौद्धिक प्रबोधन वाढवावे लागेल. आपल्यात नेतृत्व करण्याची क्षमता आहे, हे प्रत्येकाने जाणले पाहिजे. आत्मसन्मानाचा जाज्वल्य भाव निर्माण झाला की सत्ता आपोआप आकर्षित होते.

शासनकर्ती जमात होणे हा प्रवास एका पिढीचा नाही, तर शतकांचा संघर्ष आहे. पण या संघर्षात जर आपण विचार, संघटन आणि आर्थिक बळ या त्रिसूत्रीला स्वीकारले, तर तो दिवस दूर नाही, जेव्हा आपण केवळ मतदार नव्हे, तर सत्ताधारी आणि निर्णयकर्ते म्हणून इतिहास लिहू.

**– प्रवीण बागडे**
**नागपूर**
**मो.क्र. ९९२३६२०९१९**

# यांच्यावर देशद्रोहाचा खटला दाखल करा !

## वाचक पत्र

'अतिथी देवो भव:' म्हणून ख्याती असलेल्या भारतात दरवर्षी लाखो विदेशी पर्यटक येत असतात. येथील प्राचीन भारतीय संस्कृती, येथील विविधतेतील एकता, परंपरा, पोशाख, भाषा त्यांना भुरळ घालते. पर्यटनाच्या माध्यमातून दरवर्षी देशाच्या तसेच राज्यांच्या तिजोरीमध्ये अब्जावधी रुपयांची भर पडत असते.

पाहुण्यांचा आदर करण्यास शिकवणारी, अतिथींमध्ये देवाचे रूप पाहणारी आपली संस्कृती पर्यटकांवर गारुड निर्माण करते. मागील काही वर्षांपासून मात्र काही विकृत मनोवृत्तीच्या धेंडांमुळे विदेशी पर्यटकांना भारतात वाईट अनुभव येऊ लागले आहेत. याच वर्षी हम्पी येथे पर्यटनासाठी आलेल्या इस्त्रायली तरुणीसह भारतीय तरुणीवर सामूहिक बलात्कार झाल्याची घटना घडली होती. त्यापाठोपाठ दिल्लीत एक ब्रिटिश पर्यटकावर अत्याचार झाल्याची घटना वाचनात आली होती. सिंहगडावरील घटनेने तर महाराष्ट्राचीही नाचक्की झाली होती.

सिंहगडावर गिर्यारोहणासाठी आलेल्या न्यूझीलंडच्या एका तरुण पर्यटकाला काही अल्पवयीन मुलांनी मराठीतील अश्लील आणि गलिच्छ शिव्या द्यायला लावल्या. नुकतीच इंदूरमध्ये ऑस्ट्रेलियन महिला क्रिकेटर्सचा विनयभंग झाल्याची घटना घडली. आयसीसी महिला विश्वचषक खेळण्यासाठी भारतात आलेल्या ऑस्ट्रेलियन संघाच्या दोन क्रिकेटपटू हॉटेलबाहेर पडत असताना दुचाकीवरून आलेल्या अकील खान नावाच्या इसमाने त्यांचा विनयभंग केला. या घटनेची पोलिसांकडून तातडीने दखल घेण्यात आली आणि तासांतच अकील खानला अटक करण्यात आली.

या सर्व घटना आंतरराष्ट्रीय स्तरावर भारताची प्रतिमा मलिन करणाऱ्या आहेत. एक सुसंस्कृत देश म्हणून जगभरात भारताची ख्याती आहे अशा सुसंस्कृत देशाची काही नराधमांमुळे आज बदनामी होत आहे. अशा नराधमांना आयुष्यभराची अद्दल घडेल आणि भविष्यात पुन्हा कोणी असे करण्यास धजावणार नाही अशाप्रकारची कठोर शिक्षा केली जाणे अपेक्षित आहे. देशाची प्रतिमा मालिन करणाऱ्या या धेंडांवर देशद्रोहाचाही गुन्हा प्रविष्ट करण्यात यावा !

**– सौ. मोक्षदा घाणेकर,**
**काळाचौकी, मुंबई**

This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२

# थोडक्यात

## तिसऱ्या युथ आशियाई क्रीडा स्पर्धेत भारताला सुवर्णपदक



**अक्षराज : जे.के.पोळ**

**दि.२६, मुंबई :** बहरीनमधील मनामा येथे आशियाई युवा क्रीडा स्पर्धा २०२५ मध्ये भारताने कबड्डीमध्ये पूर्ण विजय मिळवत सुवर्ण पदक पटकावले. मुलींच्या संघात कांजूरमार्ग येथील खेळाडू कुमारी सेरेना सचिन म्हसकर हिने भारताचे प्रतिनिधित्व करण्याचा मान मिळवला. या कामगिरीबद्दल क्रीडा मंत्री ॲड माणिकराव कोकाटे यांनी सेरेनासह भारतीय कबड्डी संघाचे अभिनंदन केले आहे. १९ ते २३ ऑक्टोबर २०२५ रोजी पार पडलेल्या तिसऱ्या युथ आशियाई क्रीडा स्पर्धेत मुंबई उपनगर जिल्ह्यातील कांजूरमार्ग येथील स्वराज्य स्पोर्ट्स क्लबची खेळाडू कुमारी सेरेना म्हसकर हिने भारताचे प्रतिनिधित्व करण्याचा मान मिळवला. मुले आणि मुली या दोन्ही भारतीय संघाने या स्पर्धेत अत्यंत उल्लेखनीय कामगिरी करीत सुवर्णपदक पटकावून देशाचा मान उंचावला. या उत्कृष्ट यशाबद्दल क्रीडा व युवक कल्याण मंत्री ॲड. माणिकराव कोकाटे यांनी कुमारी सेरेना म्हसकर हिचे तसेच प्रशिक्षक, पालक व स्वराज्य स्पोर्ट्स क्लबच्या व्यवस्थापनाचे विशेष अभिनंदन केले. त्यांनी आपल्या शुभेच्छा संदेशात म्हटले की, महाराष्ट्रातील तरुण खेळाडूंनी आंतरराष्ट्रीय पातळीवर केलेली कामगिरी ही राज्यातील क्रीडा क्षेत्रासाठी प्रेरणादायी आहे. शासनाकडून अशा प्रतिभावंत खेळाडूंना सर्वतोपरी सहकार्य केले जाईल. सेरेनाच्या या यशामुळे मुंबई उपनगर जिल्ह्यात आनंदाचे वातावरण असून क्रीडा क्षेत्रातील नवोदितांसाठी ती प्रेरणास्थान ठरली आहे. अंतिम फेरीत, दोन्ही भारतीय संघ इराणविरुद्ध आमनेसामने आले, परंतु सामने अगदी वेगळ्या शैलीत झाले. मुलांच्या संघाने कठीण संघर्षाचा सामना केला आणि शेवटी ३५-३२ अशा जवळच्या गुणांसह इराणवर विजय मिळवला. याउलट, मुलींच्या संघाने उत्कृष्ट प्रदर्शन करत इराणचा ७५-२१ असा जबरदस्त पराभव केला.

## दरेगाव वणी शाळेत माजी विद्यार्थी स्नेह मेळावा संपन्न



**अक्षराज : दीपक शिवले**

**दि.२६, कळवण (नाशिक) :** माझी शाळा, माझा अभिमान या मुख्य कार्यकारी अधिकारी आ. ओकांर पवार यांच्या संकल्पनेतून जि.प. प्राथमिक शाळा दरेगाव वणी शाळेत शाळेच्या माजी विद्यार्थ्यांचा स्नेह मेळावा आयोजीत करण्यात आला. यावेळी मेळाव्याचे अध्यक्ष शाळेचे माजी विद्यार्थी, सरपंच नामदेव बहिरम होते. यावेळी दिवाळी सुटीनिमित्त आलेल्या माजी विद्यार्थ्यांनी स्नेह मेळाव्यास आवर्जून उपस्थिती दर्शविली. यामध्ये विश्वास भोये वर्ग २ अधिकारी, प्रकाश भोये, दत्तू राऊत, विजय बहिरम, सुभाष कुवर, भरत राऊत शिक्षक वर्ग, पांडु बहिरम ,पोलीस, आरतीताई भोये, आरोग्य सेविका, बुधाजी बहिरम क्लर्क, डॉ.प्रविण भोये, वसंत गवळी कर्मचारी याबरोबरच सरपंच मन्साराम गवळी, धनराज राऊत, पुंडलिक गवळी, कृष्णा जोपळे, काशिनाथ भोये, कैलास गवळी, त्र्यंबक गवळी, भगवंत गवळी, तुळशिराम कुवर, शिवाजी बहिरम, गणेश राऊत, रत्नाबाई कुवर, पपी गवळी आदी माजी विद्यार्थी हजर होते. सरस्वती पूजन करण्यात येवून सर्व माजी विद्यार्थ्यांचा यथोचित गौरव करण्यात आला. यावेळी त्यांनी आपले शालेय अनुभव कथन केलेत आम्ही या ज्ञान मंदिरामुळेच मोठे होवून आज या पदावर विराजमान झालो. तेव्हा शाळेच्या ऋणातून मुक्त होताच येणार नाही पण शाळेला भौतिक सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी सदैव कार्यतत्पर राहू असे मनोगतात सांगितले. शेवटी चहापान होवून पसायदानाने स्नेह मेळाव्याची यशस्वीरीत्या सांगता करण्यात आली. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी मुख्याध्यापक राजेंद्र जाधव, सहकारी शिक्षक सुनिल पवार यांनी विशेष परिश्रम घेतले.

## म्हाडा अधिकाऱ्याने पत्नी-मुलींच्या त्रासाला कंटाळून गळफास लावला

### आता मी जातोय पण यांना सोडू नको ताई असा शेवटचा संदेश देत संपवली जीवनयात्रा



**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.२६, पुणे :** लक्ष्मीनगर पर्वती भागात राहणाऱ्या म्हाडा विभागातील वरिष्ठ लिपिक नितीन साळवे (वय अंदाजे ४६ ते ४९) यांनी पत्नी आणि मुलींकडून होत असलेल्या सततच्या त्रासाला कंटाळून राहत्या घरी गळफास घेऊन आत्महत्या केल्याची धक्कादायक घटना दिनांक २४ ऑक्टोबर रोजी उघडकीस आली आहे. दुपारी साडेतीनच्या सुमारास घडलेल्या या घटनेमुळे परिसरात खळबळ माजली असून, पर्वती पोलीस ठाण्यात या प्रकरणाची आकस्मिक मृत्यू म्हणून नोंद करण्यात आली आहे. मृत नितीन साळवे हे मुंबई येथील म्हाडा कार्यालयात वरिष्ठ लिपिक म्हणून कार्यरत होते आणि दर आठवड्याच्या शेवटी ते पुण्यात कुटुंबासोबत राहत असत. त्यांच्या मागे पत्नी, तीन मुली आणि एक मुलगा असा परिवार आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, आत्महत्येच्या काही वेळ आधीच पती-पत्नीमध्ये जोरदार वाद झाला होता. घरातून बाहेर पडताना नितीन यांनी पत्नीला रागाच्या भरात म्हटलं, आता तुला विधवा करतो, आणि काही क्षणातच घरात गळफास घेतला. स्थानिक नागरिकांनी तात्काळ त्यांना रुग्णालयात दाखल केलं, मात्र उपचार सुरू होण्यापूर्वीच त्यांचा मृत्यू झाला. आत्महत्येच्या अगोदर नितीन यांनी आपल्या बहिणीला व्हिडिओ कॉल करून सांगितलं - आता मी जातोय, पण यांना सोडू नको ताई. त्यांच्या या शेवटच्या शब्दांनी बहिणी आणि नातेवाईकांचे हृदय पिळवटून निघाले. दरम्यान, मृत नितीन साळवे यांच्या बहिणी पूनम उमेश कांबळे यांनी नितीनच्या पत्नी आणि दोन मुलींवर गंभीर आरोप केले आहेत. पूनम यांनी सांगितले की, नितीनला त्याची पत्नी आणि दोन मुली सतत त्रास देत होत्या. घरात रोज भांडणं होत असत. पत्नीचे बाहेर अनैतिक संबंध होते. आत्महत्येच्या दिवशी मोठ्या मुलीने नितीनच्या छातीवर लाथ मारली आणि पत्नी तसेच दोन मुलींनी अपमानास्पद वर्तन केले. त्यामुळेच नितीनने मला शेवटचा व्हिडिओ कॉल करून आत्महत्या केली, असा आरोप त्यांनी केला आहे. या घटनेमुळे पुण्यात तसेच म्हाडा वर्तुळातही एकच खळबळ उडाली आहे. घटनेनंतर नातेवाईकांनी संताप व्यक्त करत आरोपींवर कठोर कारवाई करण्याची मागणी केली आहे. पर्वती पोलिसांनी प्राथमिक तपास सुरू केला असून, नितीन साळवे यांच्या मृत्यू मागील खऱ्या कारणांचा शोध सुरू आहे.

## राज्य कुमार गट तायक्कांदो अजिंक्यपद स्पर्धेत पुणे, रत्नागिरी, पालघर, उपनगरचे वर्चस्व

**अक्षराज : संदीप येवले**

**दि.२६, मुंबई :** डेरवण-रत्नागिरी येथील एस.व्ही.जे.सी.टी.क्रीडा संकुलात नुकतीच ३५ वी महाराष्ट्र राज्य कुमार गट (मुलगे-मुली) तायक्कांदो फाईट व ११वी पूमसे अजिंक्यपद स्पर्धा २०२५ उत्साहात पार पडली.या स्पर्धेत महाराष्ट्रातील विविध जिल्ह्यांतील निवडक खेळाडूंनी सहभाग नोंदविला होता.




**फाईट प्रकारात**

पुणे जिल्हा - प्रथम
रत्नागिरी जिल्हा - द्वितीय
ठाणे जिल्हा - तृतीय

**पूमसे प्रकारात**

पालघर जिल्हा - प्रथम
मुंबई उपनगर - उपनगर
रत्नागिरी जिल्हा - तृतीय

सदर राज्यस्तरीय स्पर्धेतील सुवर्णपदक विजेते खेळाडू येत्या दिनांक ३१ ऑक्टोबर ते २ नोव्हेंबर २०२५ या कालावधीत कोरा मंगळम इंदोर स्टेडियम, बेंगळुरू (कर्नाटक) येथे होणाऱ्या राष्ट्रीय अजिंक्यपद तायक्कांदो स्पर्धेत महाराष्ट्राचे प्रतिनिधित्व करणार आहेत.

महाराष्ट्र संघात मुलांच्या १० वजनी गटातील आणि मुलींच्या १० वजनी गटातील सुवर्णपदक विजेते खेळाडू तसेच पूमसे प्रकारातील प्रत्येकी १० खेळाडू,प्रशिक्षक व व्यवस्थापक यांचा समावेश असून महाराष्ट्र संघ २९ ऑक्टोबर रोजी रवाना होणार आहे.

विजेत्या खेळाडूंना व महाराष्ट्र संघाला राज्य संघटनेचे अध्यक्ष डॉ.अविनाश बारगजे, महासचिव मिलिंद पठारे, कोषाध्यक्ष व्यंकटेश कररा, उपाध्यक्ष धुलीचंद मेश्राम, नीरज बोरसे, प्रवीण बोरसे, सचिव सुभाष पाटील, सदस्य अजित घारगे आणि सतीश केमस्कर तसेच राष्ट्रीय संघटनेचे अध्यक्ष डॉ.इशारी गणेश व महासचिव आर. डी. मंगेशकर.कर्नाटका राज्य संघटनेचे महासचिव कृष्णमूर्ती यांनी हार्दिक शुभेच्छा दिल्या.

## चंद्रपूरमध्ये पुन्हा वाघाचा कहर

### वाघाच्या हल्ल्यात शेतकरी जागीच ठार; आकापूर येथील घटना

**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.२६, नागभीड (चंद्रपूर) :** नागभीड तालुक्यातील तळोधी. (बाळापूर) जवळील आकापूर शेतशिवारात शनिवार, दि.२५ ऑक्टोबर २०२५ रोजी सकाळी एका धक्कादायक घटनेत वाघाने ५५ वर्षीय शेतकऱ्याचा बळी घेतला. वाघाच्या हल्ल्यातील ही घटना उघडकीस आल्यानंतर परिसरात मोठी खळबळ माजली आहे. वासुदेव लक्ष्मण वेटे (वय ५५) असे मृत शेतकऱ्याचे नाव आहे. ते दिनांक २४ ऑक्टोबर २०२५ ला सायंकाळी आपल्या धान पिकाची पाहणी करण्याकरीता शेतात गेले होते, मात्र, रात्री उशिरापर्यंत घरी परतले नाहीत. कुटुंबियांनी व गावकऱ्यांनी



रात्रभर शोध घेतला, परंतू ते सापडले नाहीत. अखेर, दिनांक २५ ऑक्टोबर २०२५ रोजी सकाळी शेताच्या एका बाजुला त्यांचा मृतदेह आढळून आला. घटनास्थळावरील वाघाच्या स्पष्ट खुणांवरुन हा हल्ला वाघानेच केल्याचे वनविभागाने प्राथमिक दृष्ट्या निश्चित केले आहे.


**वनविभागाच्या हलगर्जीपणावर नागरिकांचा संताप**

या घटनेनंतर नागरिकांमध्ये प्रचंड भीती व संतापाचे वातावरण पसरले आहे. मिळालेल्या माहितीनुसार, मागील आठवड्याभरापासून या आकापूर शेतशिवारात वाघाचे प्रस्थ होते. नागरिकांनी वारंवार तळोधी वनपरिक्षेत्र कार्यालयाला लेखी निवेदन देऊन या पट्टेदार वाघाचा बंदोबस्त करण्याची मागणी केली होती. मात्र, वनविभागाने या गंभीर बाबीकडे दुर्लक्ष केले. फक्त पाहणी करण्याशिवाय कॅमेरे बसविणे किंवा पिंजरा लावणे यासारख्या प्रभावी उपाययोजना वन विभागाने केल्या नाहीत, त्यामुळेच एका शेतकऱ्याचा बळी गेल्याचा आरोप करीत नागरिकांनी घटनास्थळी वनपरिक्षेत्राधिकारी शहा यांना घेराव घालीत नागरिकांनी संताप व्यक्त केला. जोपर्यंत नागरिकांना सुरक्षिततेची ठोस हमी दिली जाणार नाही, तोपर्यंत मृतदेह घटनास्थळावरुन उचलण्यास नागरिकांनी स्पष्ट नकार दिला. अखेर तीन- चार तासानंतर शहा यांनी नरभक्षक वाघाचा बंदोबस्त करण्यासोबतच विविध मागण्या अवघ्या तीन दिवसात पूर्ण करण्याचे लेखी आश्वासनानंतरच मृतदेह उचलण्यात आला आणि घेराव मागे घेण्यात आला. पोलिसांनी मृतदेह ताब्यात घेऊन नागभीड येथील ग्रामीण रुग्णालयात शवविच्छेदनासाठी पाठविले. वनविभागाच्या वतीने मृतकाच्या कुटुंबियांना २५ हजार रुपयाची तातडीची आर्थिक मदत देण्यात आली आहे.

## शिवसेना पदाधिकारी आणि पक्ष कार्यकर्ता मेळाव्याला उपमुख्यमंत्री शिंदेंनी व्हिडिओद्वारे संबोधितले

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.२६, यवतमाळ :** यवतमाळ जिल्ह्यात आयोजित करण्यात आलेल्या शिवसेना पदाधिकारी आणि पक्ष कार्यकर्ता मेळाव्याला उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी व्हिडिओद्वारे संबोधित केले.





यावेळी उपस्थित भगव्या जनसागरासमोर उपमुख्यमंत्री शिंदे यांनी त्यांचे मनोगत सादर केले. खरं तर या मेळाव्यासाठी स्वतः उपस्थित राहणार होतो, मात्र वातावरण खराब असल्याने ते शक्य होऊ शकले नाही. त्यामुळे ऑनलाईन संवाद साधावा लागत असल्याचे याप्रसंगी उपमुख्यमंत्री यांनी नमूद केले. शिवसंकल्प शिबिरात सहभागी झालेल्या आणि प्रशिक्षित झालेल्या बूथप्रमुख गट प्रमुखांशी यावेळी संवाद साधला. सध्या राज्यात अचानक पूरस्थिती उद्भवली असून सरकारने आपतग्रस्त शेतकऱ्यांना मदत जाहीर केली आहे. ही मदत नक्की त्यांच्यापर्यंत पोहचवली जाईल. आपण सगळे शेतकऱ्यांना वाऱ्यावर सोडणार नसून त्यांच्या पाठीशी ठाम पणे उभे रहायचे आहे असे याप्रसंगी शिवसैनिकांना आवाहन केले. काही दिवसांपूर्वी काही जणांनी ढोलकी बजाव आंदोलन केले होते. कारण त्यांचे प्रमुखच डबल ढोलकी आहेत. त्यामुळेच त्यांना थाप देऊन जनतेने कायमचे घरी बसवले आहे. काही जणांनी दिवाळी मध्ये मनोमिलनाचे अंक दाखवले, मात्र जनता त्यांचे दिवाळे नक्की काढेल असा विश्वास यावेळी व्यक्त केला.

शासनाच्या माध्यमातून यवतमाळ जिल्ह्यात अनेक विकासकामे सुरू आहेत. पालकमंत्री संजय राठोड हे जलसंधारण मंत्री असल्याने त्यांचे देखील इथे बरेच लोकोपयोगी काम सुरू आहे. लाडकी बहिण योजना कधीही बंद होणार नाही, शासन आपल्या दारीचे लाभ अनेक लाभार्थ्यांपर्यंत पोहोचले असल्याचे ही याप्रसंगी अधोरेखित केले. केंद्रात एनडीए आघाडीत शिवसेना पक्षाला मानाचे स्थान आहे. त्यामुळे आता आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत यशस्वी होण्याचे आव्हान आपल्यापुढे आहे.

बूथप्रमुख, गट प्रमुखांनी यासाठी पूर्ण शक्तिनिशी मैदानात उतरावे लागेल, प्रत्येकाला एकनाथ शिंदे बनून काम करावे लागेल. मतदार याद्या दुरुस्त कराव्या लागतील, तसेच घरोघरी शिवसेना पोहचवावी लागेल अशी अपेक्षा यावेळी व्यक्त केली.

याप्रसंगी केंद्रीय मंत्री प्रतापराव जाधव, जलसंधारण मंत्री तथा यवतमाळचे पालकमंत्री संजय राठोड, पाणीपुरवठा मंत्री गुलाबराव पाटील, आमदार नरेंद्र भोंडेकर, शिवसेना सचिव भाऊसाहेब चौधरी, शिवसेना प्रवक्त्या प्रा.ज्योती वाघमारे तसेच स्थानिक शिवसेना पदाधिकारी आणि शिवसैनिक बहुसंख्येने उपस्थित होते.

## परतीच्या पावसामुळे शहापुर तालुक्यातील शेतकरी संकटात !

**अक्षराज : सुनिल फर्डे**

**दि.२६, शहापूर (ठाणे) :** शहापूर तालुक्यातील सर्वच भागात परतीच्या पावसामुळे कापून ठेवलेल्या भातात पाणीच पाणी झाल्यामुळे बळीराजाच्या हातातोंडासी आलेला घास हिरावून जाण्याची शक्यता निर्माण झाली असुन यामुळे शेतकरी पूर्णपणे संकटात सापडला आहे.या भिजलेल्या भातामुळे पेंढा ही वाया जाणार असल्यामुळे गुरांच्या चाऱ्याचा प्रश्न गंभीर बनला आहे.



दसरा झाल्यानंतर भात कापणीला सुरुवात केली जाते. परंतु काही दिवस पावसाची परिस्थिती पाहून १५ तारखेनंतर पडलेल्या लख्ख प्रकाशामुळे शेतकऱ्यांनी भात कापणीला सुरवात केली.चार पाच दिवसात शेतकऱ्यांनी मोठ्या प्रमाणात भात कापणी करून ठेवली.परंतु हवामानाच्या दिलेल्या अंदाजानुसार ऐन दिवाळीत पाऊस पडणार असल्याचे भाकीत तंतोतंत खरे ठरले असल्याचे दिसून आले. शहापूर तालुक्यात आज झालेल्या वादळवारा व तुफान पावसामुळे कापून ठेवलेल्या भातात पाणीच पाणी झाले असुन,यामुळे भाताचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले असून शासनाने लवकरच लवकर पंचनामे करून नुकसान भरपाई द्यावी अशी मागणी शेतकरी वर्गातून केली जात आहे.

# बल्लारपूर येथे दोन दिवसीय धम्म महोत्सवासह प्रबोधनात्मक कार्यक्रमाचे आयोजन

**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.२६, बल्लारपूर (चंद्रपूर) :** डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या धम्मदीक्षेला अभिवादन आणि बुद्ध धम्माचा प्रचार-प्रसार करण्याच्या उद्देशाने बल्लारपूर येथे दोन दिवसीय भव्य धम्म महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे.

हा महोत्सव २८ आणि २९ ऑक्टोबर २०२५ रोजी विजय स्तंभ परिसर, जयभीम चौक बल्लारपूर येथे सकाळी १० वाजता सुरू होणार आहे. महोत्सवाचे उद्घाटन भदंत बोधीपालो महाथेरो (औरंगाबाद) यांच्या हस्ते तर अध्यक्षस्थानी भदंत विनयबोधी महाथेरो (मुंबई) राहणार आहेत. पहिल्या दिवशी सकाळपासून विविध धार्मिक कार्यक्रम, धम्म प्रवचन, भिक्षूंचे मार्गदर्शन आणि धम्मचर्चा यांचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमात भदंत सुमनवनो महाथेरो, भदंत करुणाबोधी महाथेरो, भदंत नागदीप महाथेरो, भदंत संघवंश थेरो, भदंत आनंद थेरो, भदंत श्रद्धारक्षित, भदंत रत्नमणी थेरो, भदंत मैत्री बोधी आणि भिक्खू धम्मप्रकाश संबोधी आदी भंतेजी उपस्थित राहणार आहेत.दुसऱ्या दिवशी सायंकाळी ४ वाजता संघर्ष भगत यांच्या सादरीकरणात बुद्ध-भीम गीतांचा बहारदार कार्यक्रम होणार असून, महाराष्ट्रातील प्रख्यात कवी आणि गायक सहभागी होणार आहेत.




त्याचप्रमाणे २९ ऑक्टोबर रोजी सायंकाळी ७ वाजता प्रमुख पाहुण्यांचे मार्गदर्शन होईल. या कार्यक्रमाचे अध्यक्ष ना. अण्णासाहेब बनसोडे (उपाध्यक्ष, विधानसभा महाराष्ट्र) राहतील. तर प्रमुख अतिथी म्हणून राष्ट्रवादी काँग्रेस चे राजेंद्र जैन, आमदार राजे धर्मराव बाबा आत्राम, राजकुमार बडोले, आमदार अमोल मिटकरी, सुनील मगरे, नितीन भटारकर, राजीव कक्कड, दीपक जयस्वाल, राकेश सोमाणी आणि रंजना पारशिवे हे मान्यवर उपस्थित राहणार आहेत. या धम्म महोत्सवाचे मुख्य आयोजक प्रशांत झामरे (जिल्हाध्यक्ष, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी - सामाजिक न्याय विभाग) असून, त्यांनी डॉ.आंबेडकरांचे सामाजिक संदेश आणि बौद्ध तत्त्वज्ञान जनमानसात पोहोचविण्याच्या उद्देशाने या भव्य कार्यक्रमाचे आयोजन केले असल्याची माहिती दिली.

# फुटबॉल मधील भविष्यातील हिरे घडविण्यासाठी क्रीडा विभागाचा प्रोजेक्ट महादेवा

## महाराष्ट्रातील १३ वर्षांखालील मुला-मुलींच्या फुटबॉल कौशल्याचा शोध घेण्यासाठी शासनाचे प्रयत्न

**अक्षराज : जे.के.पोळ**

**दि.२६, ठाणे :** मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या दूरदर्शी नेतृत्वाखाली प्रोजेक्ट महादेवा ही योजना महाराष्ट्रातील १३ वर्षांखालील मुलगा मुलींच्या फुटबॉल कौशल्याचा शोध घेण्यासाठी आणि त्यांना प्रोत्साहन देण्यासाठी सुरू करण्यात आली आहे. निवड प्रक्रिया तीन टप्प्यांत पार पडणार आहे – जिल्हास्तरावरील निवड चाचण्या, प्रादेशिक फेरी आणि अंतिम निवड फेरी. अंतिम टप्प्यात ६० मुलांची निवड सीआयडीसीओ ग्राऊंड, खारघर येथे आणि ६० मुलींची निवड डब्ल्यूआयएफए कूपरेज मैदान, मुंबई येथे केली जाईल. यापैकी प्रत्येकी ३० मुलगा मुलींची निवड केली जाईल आणि त्यांना ५ वर्षांची एकात्मिक शिष्यवृत्ती दिली जाईल, ज्यामध्ये फुटबॉल प्रशिक्षणासोबत शैक्षणिक विकासाचा ही समावेश असेल. निवड झालेल्या खेळाडूंना १४ डिसेंबर रोजी मुंबईत येणाऱ्या आंतरराष्ट्रीय फुटबॉल स्टार लिओनेल मेस्सी यांच्या फुटबॉल क्लिनिकमध्ये सहभागी होण्याची अनोखी संधी मिळेल. ही योजना चखढठअ, क्रीडा विभाग, थखत्रअ, उखृउज आणि तडढत्र यांच्या संयुक्त विद्यमाने राबविली जात असून, राज्यातील फुटबॉल क्षेत्र अधिक मजबूत करण्याचा उद्देश आहे.

इच्छुक खेळाडूंनी निवड चाचण्यांपूर्वी दिलेल्या गूगल फॉर्मद्वारे नोंदणी २६ ऑक्टोंबर पर्यंत करणे आवश्यक आहे. यानुषंगाने ठाणे जिल्ह्यातील खेळाडूंची निवड चाचणी दिनांक ०१ नोव्हेंबर २०२५ रोजी मुले व ०२ नोव्हेंबर २०२५ रोजी मुली यशवंतराव चव्हाण फुटबॉल मैदान, सेक्टर १९, नेरूळ, नवी मुंबई येथील क्रीडांगणात सकाळी ८.०० वाजेपासून आयोजित करण्यात येणार आहे. या निवड चाचणी मध्ये सहभागी होण्याकरिता खेळाडूंनी आहे. https://forms.gle/ctCMRZ4FZdxwYEvA7 या गुगल लिंक द्वारे नोंदणी करणे आवश्यक आहे. **निवड चाचणी संदर्भात महत्वाच्या सूचना :-**

१) सर्व खेळाडूंनी चाचणी स्थळी येण्यापूर्वी गुगल नोंदणी लिंकद्वारे (गुगल रजिस्ट्रेशन लिंक) आपली नोंदणी पूर्ण करणे आवश्यक आहे.

२) या निवड चाचणी मध्ये १ जानेवारी २०१२ रोजी किंवा त्यानंतर जन्मलेले आणि ३१ डिसेंबर २०१३ रोजी किंवा त्यापूर्वी जन्मलेले खेळाडू सहभागी होवू शकतील.

३) सर्व खेळाडूंनी त्यांचे मूळ आधार कार्ड आणि जन्म प्रमाणपत्र सोबत घेऊन येणे आवश्यक आहे.

४) ठाणे जिल्हास्तर निवड चाचणीत सर्वोत्तम कामगिरी करणाऱ्या पहिल्या २० खेळाडूंची निवड ही विभागस्तरीय निवड चाचणीसाठी करण्यात येईल.हा कार्यक्रम अत्यंत महत्वाचा असून, राज्यातील फुटबॉल खेळाला नवी दिशा देणारा आहे. तरी महादेवा या महत्त्वाकांक्षी योजनेत जास्तीत जास्त खेळाडूंनी सहभाग घ्यावा, असे आवाहन जिल्हा क्रीडा अधिकारी श्रीमती सुवर्णा बारटक्के यांनी केले आहे.

# श्री क्षेत्र आळंदी येथील भक्त निवास, महाद्वार ते पुंडलिक मंदिर घाट कामाचा भूमिपूजन सोहळा उपमुख्यमंत्री शिंदे यांच्या हस्ते संपन्न

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.२६, आळंदी (पुणे) :** श्री संत ज्ञानेश्वर महाराजांच्या ७५० व्या संजीवन समाधी सोहळ्यानिमित्त उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे आळंदीमध्ये आले होते. तेव्हा या मंदिराचा कलशारोहण सोहळ्याला उपस्थित राहण्याचे भाग्य मला लाभले होते. आणि त्यानंतर आज पुन्हा विविध विकास कामांचा भूमिपूजन सोहळ्यानिमित्त इथे येण्याचे भाग्य मिळाले असल्याचे याप्रसंगी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आपले मत व्यक्त केले. आळंदीला मी आजवर आठ वेळा आलो आहे. इथे आल्यावर एकदम घरात असल्यासारखे वाटते. ज्ञानेश्वर माऊलींच्या सावलीमध्ये आपण सारे काही विसरून जातो. त्यातून समाधान मिळते, मन निश्चिंत होते असे मत यावेळी व्यक्त केले. इथे भव्य भक्त निवास उभे राहत



आहे, सुंदर पुंडलिक मंदिर घाट नव्याने बांधला जातो आहे याचा फायदा इथे येणाऱ्या हजारो वारकरी बंधू भगिनींना नक्की होईल असा विश्वास याप्रसंगी व्यक्त केला. भक्तांच्या मनाची काळजी माऊली घेते, मात्र त्यांच्या शरीराची काळजी घेतली जावी यासाठी आरोग्य केंद्र उभारले जात असल्याचे यावेळी सांगितले. आळंदी येथील इंद्रायणी नदी प्रदूषणमुक्त करण्याचा संकल्प आम्ही घेतला असून त्यासाठी मुख्यमंत्र्यांसमोर सादरीकरण पार पडले आहे. लवकरच हे काम देखील हाती घेतले जाईल असा विश्वास याप्रसंगी व्यक्त केला. तसेच वारी सुरू होण्याआधी या भागातील सर्व रस्त्यांची डागडुजी दुरुस्ती करता यावी.

यासाठी नगरविकास विभागाच्या वतीने एक कोटी रुपयांचा निधी मंजूर केला असल्याचे यावेळी जाहीर केले. याप्रसंगी विधान परिषदेच्या उपसभापती डॉ.नीलम गोऱ्हे, उद्योग मंत्री उदय सामंत, रोजगार हमी मंत्री भरतशेठ गोगावले, शिवसेना पुणे शहरप्रमुख रवींद्र धंगेकर, श्री ज्ञानेश्वर महाराज संस्थान समितीचे मुख्य विश्वस्त योगी निरंजननाथ, गुरू शांतीनाथ महाराज, चैतन्य लोंढे महाराज, डॉ.भावार्थ देखणे, ॲड.रोहिणी पवार, पुरुषोत्तम पाटील, माधव खांडेकर शिवसेना धर्मवीर आध्यात्मिक आघाडीचे प्रदेशाध्यक्ष अक्षय महाराज भोसले, भगवान पोखरकर तसेच विविध संस्थांचे पदाधिकारी, कार्यकर्ते आणि भक्तगण मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# लोकशाहीर पद्मश्री कृष्णराव साबळे यांच्या स्मारकासाठी निधी देणार

## महाराष्ट्राला अभिमान वाटेल असे स्मारक उभे करा - उपमुख्यमंत्री पवार



**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.२६, सातारा :** लोकशाहीर पद्मश्री कृष्णराव साबळे यांचे सामाजिक व स्वातंत्र्य संग्रामातील योगदान मोलाचे आहे. महाराष्ट्राची लोकधारा या कार्यक्रमाच्या माध्यमातून महाराष्ट्राची लोकसंस्कृती देशभरात पोहोचवली. त्यांच्या जन्म गावी पसरणी येथे स्मारक उभारणीसाठी निधी उपलब्ध करून दिला जाईल. शाहीर साबळे यांच्या नावाला शोभेल व महाराष्ट्राला अभिमान वाटेल, असे स्मारक उभे करावे, असे प्रतिपादन उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी केले.लोकशाहीर पद्मश्री कृष्णराव साबळे यांच्या स्मारकाच्या कोनशिलाचे अनावरण पसरणी ता.वाई येथे उपमुख्यमंत्री श्री. पवार यांच्या हस्ते झाले. यावेळी ते बोलत होते.

याप्रसंगी मदत व पुनर्वसन मंत्री मकरंद पाटील, खासदार नितीन पाटील, राधाबाई साबळे, यशोमती शिंदे, उदयसिंह पाटील-उंडाळकर, पुणे विभागीय अधिस्वीकृती समितीचे अध्यक्ष हरीष पाटणे, अखिल भारतीय साहित्य संमेलनाचे कार्याध्यक्ष विनोद कुलकर्णी, राजाराम निकम, संजय साबळे, महंत सुंदरगिरी यांच्यासह विविध संस्थांचे पदाधिकारी ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. शाहीर साबळे यांनी स्वातंत्र्य संग्रामात, गोवा मुक्ती संग्राम, संयुक्त महाराष्ट्र चळवळ, हैदराबाद मुक्तिसंग्राम अशा विविध चळवळींमध्ये पोवाड्याच्या माध्यमातून जनजागृती केली.

शाहीर साबळे यांना लहानपणापासूनच गाण्यांचे बाळकडू वडिलांकडून मिळाले. साने गुरुजी, संत गाडगेबाबा यांच्यासह विविध दिग्गज मंडळींशी त्यांचा संपर्क आला. अस्पृश्यांना मंदिरात प्रवेश मिळवून देण्यासाठी त्यांनी पुढाकार घेतला. शाहीर साबळे यांचे विचार पुढच्या पिढीला कळावे यासाठी प्रयत्न करावेत. सातारा जिल्हाविषयी आपुलकी असून प्रत्येक वेळी जिल्ह्याच्या विकासासाठी भरघोस निधी दिला आहे, असे सांगून उपमुख्यमंत्री श्री.पवार म्हणाले, महाराष्ट्रातील गड किल्ल्यांच्या संवर्धनाचे काम शासनाने हाती घेतले आहे. या माध्यमातून सातारा येथील क्षेत्र माहुली घाटांचा विकास व सुशोभीकरण तसेच अजिंक्यतारा किल्ल्याचे ही संवर्धन केले जाणार आहे. बा.सी. मर्ढेकर यांचे मर्ढे येथील स्मारक पूर्ण झाले असून याचेही उद्घाटन लवकर करण्यात येईल. तसेच सातारा येथे अखिल भारतीय साहित्य संमेलन होणार आहे.

या संमेलनाला शासनामार्फत सर्व ती मदत केली जाईल अशी ग्वाही उपमुख्यमंत्री श्री.पवार यांनी दिली. यावेळी मदत व पुनर्वसन मंत्री पाटील म्हणाले, पद्मश्री लोकशाहीर साबळे यांचे संयुक्त महाराष्ट्रात चळवतील योगदान व सामाजिक कार्य विसरता येणार नाही. त्यांनी शाहिरीच्या माध्यमातून समाज प्रबोधनाचे काम केले.

शाहीर साबळे यांच्या शाहिरीची दिग्गज मंडळींनी नोंद घेऊन त्यांचे कौतुक केले. राष्ट्रपतींच्या हस्ते शाहीर साबळे यांना पद्मश्री पुरस्कार देऊन गौरविण्यात आले.पसरणी येथील शाहीर साबळे यांच्या स्मारकाला ३० कोटी निधी लागणार आहे. हा निधी उपलब्ध करून द्यावा, अशी मागणी करून शाहीर साबळे यांच्या नावाला साजेल असे स्मारक उभे केले जाईल, असेही मंत्री श्री.पाटील यांनी कार्यक्रमाप्रसंगी सांगितले.

# थोडक्यात

## अभिनेते सयाजी शिंदे यांच्या शुभहस्ते बालनाट्य शिबिराचा शुभारंभ




**अक्षराज : आदिनाथ देशमुख**

**दि.२६, नवी मुंबई :** नवी मुंबई बालारंग भूमी आणि संत शिरोमणी कला मंच नवी मुंबई यांच्या संयुक्त विद्यामाने आयोजित ज्येष्ठ अभिनेते सयाजी शिंदे यांच्या शुभहस्ते वाशी विश्वनाथ भावे नाट्यगृह तालीम हॉलमध्ये बालनाट्य अभिनय कार्यशाळेचा शुभारंभ संपन्न झाला. विजय तेंडुलकर लिखित सखाराम बाईंडर या नाटकाचे दिग्दर्शक अभिजीत झुंजारराव हे याप्रसंगी उपस्थित होते. यानिमित्ताने नाटककार श्रीहरी पवळे यांचे अभिनेते सयाजी शिंदे यांनी या शिबिराबद्दल कौतुक केले आणि विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या.

## समुद्रात कमी दाबाचा पट्टा; मच्छीमारांना समुद्रात न जाण्याच्या सूचना

**अक्षराज : जे.के.पोळ**

**दि.२६, मुंबई :** राज्यातील सागरकिनाऱ्यावरील सर्व मच्छीमारांना सतर्कतेचा इशारा देण्यात आला आहे. भारतीय हवामान विभागाच्या माहितीनुसार, पश्चिम किनारपट्टीवर २५ ते २९ ऑक्टोबर २०२५ या कालावधीत कमी दाबाचा पट्टा निर्माण झाला आहे. त्यामुळे वाऱ्याचा वेग ३५ ते ४५ किमी प्रतितास राहील. काही ठिकाणी तो ५५ किमी प्रतितासपर्यंत जाऊ शकतो. त्यामुळे हवामान विभाग आणि भारतीय तटरक्षक दलाने मच्छीमारांना समुद्रात न जाण्याचा इशारा दिला आहे.

समुद्रामध्ये असलेल्या सर्व मासेमारी नौकांनी तात्काळ सुरक्षितपणे बंदरात परत यावे. तसेच स्थानिक बंदर अधिकाऱ्यांशी संपर्क ठेवावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

## टिळक नगर पोलीस ठाण्याची प्रामाणिक व तत्पर सेवा

**अक्षराज : विश्वनाथ शेनोय**

**दि.२६, ठाणे :** टिळक नगर पोलीस ठाण्याच्या दक्ष आणि प्रामाणिक तपासामुळे एका नागरिकाची हरवलेली बॅग सुरक्षितरित्या परत मिळाली आहे. रेसीडन्सी, कांचनगाव, ठाकुर्ली (पूर्व) येथील रहिवासी आर.सुनीता या हैदराबादवरून आल्यानंतर रिक्षामध्ये प्रवास करत असताना त्यांची बॅग हरवली होती. या संदर्भात त्यांनी टिळक नगर पोलीस ठाण्यात तक्रार नोंदवली होती. तक्रार प्राप्त होताच वरिष्ठ पोलीस निरीक्षक विजयकुमार कदम यांच्या मार्गदर्शनाखाली महिला पोलीस उपनिरीक्षक तेजल पवार, पोलीस हवालदार श्रीकृष्ण कानडे तसेच पोलीस शिपाई सचिन बोर्डे आणि प्रशांत शिरसाट यांनी तांत्रिक तपासाद्वारे बॅग शोधून काढण्यात यश मिळवले. सदर बॅगेत अडीच लाख रुपयांचा सोन्याचा हार आणि २ हजार रोख रक्कम होती. ही बॅग पूर्णपणे सुरक्षित अवस्थेत परत देण्यात आली. आर.सुनीता यांनी टिळक नगर पोलीस ठाण्याचे तसेच ठाणे पोलीस प्रशासनाचे मनःपूर्वक आभार मानले असून नागरिकांच्या सेवेसाठी पोलीस दल तत्पर असल्याचे पुन्हा एकदा सिद्ध झाले आहे.

## मुसळधार पावसामुळे शेतकऱ्यांवर मोठे संकट; भाताचे पीक पुर्णतः उध्वस्त



**अक्षराज : अक्षय गिरा**

**दि.२६, शहापूर (ठाणे) :** गेल्या अनेक दिवसांपासून सुरू असलेल्या मुसळधार पावसामुळे शहापूर तालुक्यातील शेतकऱ्यांवर मोठे संकट कोसळले आहे. भात कापणी केलेले पीक पूर्णपणे पाण्यावर तरंगत असून त्यात कुजण्याची प्रक्रिया सुरू झाली आहे. त्यामुळे शेतकऱ्यांचे प्रचंड नुकसान झाले आहे. पावसामुळे जमिनीमध्ये पाणी साचल्याने अनेक शेतकऱ्यांच्या शेतात उभे असलेले तसेच कापलेले भाताचे पीक नष्ट झाले आहे. या नैसर्गिक आपत्तीमुळे शेतकऱ्यांच्या चेहऱ्यावर चिंता स्पष्ट दिसत आहे. या संकटात दिवाळीचा सण ही शेतकऱ्यांसाठी आनंदा ऐवजी दुःखाचा ठरला आहे. शेतकऱ्यांनी प्रशासनाकडे तातडीने मदत आणि नुकसानभरपाईची मागणी केली आहे.

## गरीब विद्यार्थिनीच्या कुटुंबाला मराठा महासंघाची मदत

**अक्षराज : दिलीप कांबळे**

**दि.२५, वाई (सातारा) :** जिल्हा परिषद आदर्श शाळा बावधन तालुका वाई येथील इयत्ता सहावी मध्ये शिकत असलेली विद्यार्थिनी कुमारी समीक्षा सुरज जोगदंड वय बारा वर्ष हिचे आकस्मित दुःखद निधन झाले. या घटनेने शाळा व गावात शॉक काळा पसरली होती. समीक्षा शाळेत हुशार व लाडकी विद्यार्थिनी होती. तिची आई प्रियांका आजारी असते व वडील परगावी असल्याने घरची परिस्थिती हालाकीची झाली होती. अशा कठीण काळा त ते घरात सुखाचा दिवा जळू दे या भावनेतून मदतीचा हात म्हणून मराठा महासंघाचे जिल्हाध्यक्ष विक्रम वाघ यांनी ५ हजार रुपये रोख व दोन महिना पुरेल एवढे किराणा साहित्य अशी भरीव मदत दिली. यापुढेही मदत व सहकार्य करणार असल्याचे आश्वासन जिल्हा अध्यक्ष विक्रम वाघ यांनी दिली. तसेच शाळेतील शिक्षिका सुरेखा कांबळे व त्यांच्या सहकारी घरी येऊन मदतीचा हात दिला व दुःख व्यक्त केले. यावेळी शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष शीराम, पोद्दार ग्रामपंचायत सदस्य अजित पिसाळ, विनायक कांबळे, शशिकांत चव्हाण, बाळासाहेब लगस, विशाल कांबळे, प्रियांका जोगदंड, वंदना कांबळे, शशिकला कांबळे उपस्थित होते.

## शेतकऱ्याने वाचवले हरणाच्या पाडसाचे प्राण

**अक्षराज : दिलीप कांबळे**

**दि.२५, वाई (सातारा) :** निसर्गात असलेली वृक्षवल्ली पशुपक्षी नैसर्गिक संपत्ती जतन करणे वाढवणे वाचवणे हे आपले कर्तव्य आहे. याच उदात्त हेतूने शेंदूरजणे तालुका वाई येथील सोसायटीचे संचालक व सामाजिक कार्यकर्ते शेतकरी प्रताप महादेव यादव या शेतकऱ्याने हरणाच्या नवजात पाडसाचे प्राण वाचवले प्रताप यादव हे गावातील आकुर नावाच्या शिवारात ज्वारी पिकाला पाणी देत असताना हरणाचे पिल्लू मरगळलेल्या अवस्थेत दिसले. आईच्या शोधात भुकेने व्याकुळ झालेले असल्याने त्याची हालचाल मंदावली होती. यादव यांनी तात्काळ वनविभागाला फोनवरून माहिती कळवली त्यावर वनाधिकाऱ्यांनी सल्ला दिला की, त्या पिलाची आईची व त्याची कदाचित चुकामुक झाली असेल तुम्ही पिलाला दूध किंवा पाणी पाजा यादवांनी जवळ चालू असलेल्या दाऱ्यावर पाडसाला पाणी पाजले व झाडाच्या सावलीत सुरक्षित सोडले. दुपारनंतर यादव यांनी हे पिल्लू सुखरूप आहे का ते पाहण्यासाठी शेतावर गेले असता पिल्लू दिसून आले नाही हरणाच्या पाडसाची सुरक्षित स्थळी सोडल्याबद्दल शेतकरी प्रताप यादव यांचे शेंदूरजणे गावात कौतुक होत आहे.